कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

जा. क्र. कडोंमपा/नरवि/बां/डोंबि/२०१८-१९/...
कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण
दिनांक : ०२/०१/२०१९

(बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र मुंजरी)
श्री./श्रीमती : प्रल्हाद कालू ठाकुर
कुलमुखत्यारपत्र धारक :
वास्तुशिल्पकार : मे. गोल्डन डायमेंशन, डोंबिवली (पू.)

विषय : स.न. ७, हिस्सा नं. २अ, मौजे – जुनी डोंबिवली, डोंबिवली (प.) येथे बांधकाम करण्याच्या मंजूरीबाबत.

संदर्भ : आपला दि. ०८-११-२०१८ रोजीचा मे. गोल्डन डायमेंशन, डोंबिवली (पू.) वास्तुशिल्पकार यांचे मार्फत सादर केलेला अर्ज क्र. २६३११

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ४४ अन्वये स.न. ७, हिस्सा नं. २अ, मौजे – जुनी डोंबिवली, डोंबिवली (प.) मध्ये १२५०.०० चौ. मी. क्षेत्र व वाढीव चटई क्षेत्र ९१५.८० चौ.मी. एकूण २०६५.८० चौ.मी. क्षेत्रापैकी २०६३.६८ चौ.मी. क्षेत्र भूखंडाचा विकास करावयास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २५३ अन्वये बांधकाम करण्यासाठी केलेल्या दि. ०८-११-२०१८ च्या अर्जास अनुसरून पुढील शर्तीस अधिन राहून तुमच्या मालकीच्या जागेत हिरव्या रंगाने दुरुस्ती दाखविल्याप्रमाणे मागील पानावर नमुद केलेप्रमाणे रहिवास, वाढे भिंतीच्या इमारतीच्या बांधकामाबाबत बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र देण्यात येत आहे इमारतीच्या व जागेच्या मालकी हक्कासंदर्भात कुठलाही वाद निर्माण झाल्यास त्याला सर्वस्वी आपण जबाबदार रहाल या अटीवर हे संमतीपत्र देण्यात येत आहे.

इमारत – स्टिल्ट(पे), तळ(पे) + पहिला मजला ते सातवा मजला (रहिवास)

सहायक संचालक
कल्याण डोंबिवली महानगरपालिका

१. हे बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र दिल्याचे तारखेपासून एक वर्षापर्यंत वैध असेल, नंतर पुढील वर्षासाठी परवानगीचे नुतनीकरण मुदत संपण्याआधी करणे आवश्यक आहे. नुतनीकरण किंवा नविन परवानगी घेताना त्यावेळी अस्तित्वात आलेल्या नियमांच्या व नियोजित विकास योजने अनुषंगाने छाननी करण्यात येईल.
२. नकाशात हिरव्या रंगाने केलेल्या दुरुस्त्या आपल्यावर बंधनकारक राहतील.
३. बांधकाम चालू करण्यापूर्वी सात दिवस आधी महापालिका कार्यालयास लेखी कळविण्यात यावे.
४. ही परवानगी आपल्या मालकीच्या कब्जातील जमिनी व्यतिरिक्त जमिनीवर बांधकाम अगर विकास करण्यास हक्क देत नाहीत.
५. इमारतीचे बांधकाम या सोबतच्या मंजूर केलेल्या नकाशाप्रमाणे आणि चालुन दिलेल्या अटीप्रमाणे करता येईल.
६. कोर्टभिंत व जोत्याचे बांधकाम झाल्यावर वास्तुशिल्पकाराचे मंजुर नकाशाप्रमाणे वाढेभिंत व जोत्याचे बांधकाम [illegible] प्रमाणपत्र, महानगरपालिकेस सादर करण्यात यावे व ते कार्यालयाकडून तपासून घेऊन, जोता [illegible] यावा व त्यानंतरच पुढील बांधकाम करण्यात यावे.
७. [illegible] प्रकारचा फेरफार पूर्वपरवानगी घेतल्याशिवाय करू नये. तसे केल्याचे आढळून [illegible] सदरची [illegible] प्रारंभ प्रमाणपत्र रद्द झाले असे समजण्यात येईल.
८. इमारतीच्या बांधकामाच्या सुरक्षिततेची (स्ट्रक्चरल सेफ्टी) जबाबदारी सर्वस्वी आपले वास्तु शिल्पकार व स्थापत्य विशारद यांचेवर राहील.
९. [illegible] मोकळ्या सोडावयाच्या जागेत बदल करू नये व त्यामध्ये कोणत्याही प्रकारचे बांधकाम करू [illegible]
१०. नागरी जमीन कमाल मर्यादा अधिनियम कायदा १९७६ च्या तरतुदीप्रमाणे जागा बाधीत होत असल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपल्यावर राहील.
११. भूखंडाकडे जाण्या-येण्याच्या मार्गाची जबाबदारी संपूर्णपणे आपलेकडे राहील बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र नियोजित रस्त्याप्रमाणे दिले असल्यास त्या रस्त्याचे काम महानगरपालिकेच्या सोयीप्रमाणे व प्राधान्याप्रमाणे केले जाईल व तसा रस्ता होईपर्यंत इमारतीकडे जाण्या येण्याच्या मार्गाची जबाबदारी सर्वस्वी आपली राहील.
१२. जागेत जुने भाडेकरू असल्यास त्यांच्या बाबत योग्य ती व्यवस्था करायची जबाबदारी मालकाची राहील व मालक भाडेकरू यामध्ये काही वाद असल्यास किंवा निर्माण झाल्यास त्याचे निराकरण मालकाने करणे आवश्यक आहे.
१३. सदर जागेत विहीर असल्यास ती ईकडील परवानगी शिवाय बुजवू नये.
१४. सदर जागेतून पाण्याचा नैसर्गिक निचरा होत असल्यास तो जलनिःसारण विभाग (कडोमपा) च्या परवानगीशिवाय वळवू अथवा बंद करू नये.

LC 66

29 40